


सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City
goodeveningcity@gmail.com
www.goodeveningcity.com
२३ मे २०२६, शनिवार | वर्ष १५ वे | अंक ४७ | पृष्ठे ४

# पेट्रोल-डिझेलच्या मागणीत ३०% वाढ

## देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केली शंका

**मुंबई, २३ मे (वृत्तसंस्था) :** राज्यात वाढत्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना तातडीच्या सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांना आवश्यक तेवढे डिझेल वेळेत उपलब्ध करून द्यावे आणि त्यांच्या कामात कोणताही अडथळा येऊ देऊ नये, असे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. ग्रामीण भागात पेट्रोल आणि डिझेल मिळत नसल्याबाबत माध्यमांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी यासंदर्भात सरकार गंभीर असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या नावाखाली कुणी इंधनाची साठेबाजी करत असेल, तर त्यावर कडक लक्ष ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.



शिर्डी येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले की, काही भागांत पेट्रोल आणि डिझेलच्या मागणीत अचानक २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. दरवर्षी किती इंधन लागते याचा अंदाज प्रशासनाला असतो, मात्र अचानक इतकी वाढ होत असेल तर त्यामागे काहीतरी गडबड असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना इंधन मिळावे आणि साठेबाजीला आळा बसावा यासाठी उपाययोजना सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. काही जिल्ह्यांत वाहनांचे आरसी बुक तपासून डिझेल देण्याची पद्धत सुरू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी हालचाली वाढवल्या आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासनाला शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत त्रास होणार नाही, याची खबरदारी घेण्यास सांगितले आहे. तसेच पुरवठा साखळीतील अडचणी दूर करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश देण्यात आले आहेत. अचानक वाढलेल्या मागणीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार प्रयत्न करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शिर्डीमध्ये आज संरक्षण क्षेत्राशी संबंधित एक महत्त्वपूर्ण प्रकल्प सुरू होणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार सुजय विखे यांच्या प्रयत्नातून उभा राहिलेला हा प्रकल्प जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून शिर्डीची ओळख आता धार्मिक केंद्रासोबत संरक्षण उत्पादन क्षेत्रातही निर्माण होणार आहे.

# ‘सिजेपी’च्या अभिजीत दीपकेच्या घराबाहेर पोलिस बंदोबस्त


**मुंबई, २३ मे (वृत्तसंस्था) :** सोशल मीडियावरील कॉकरोच जनता पार्टीच्या माध्यमातून देशातील व्यवस्था व बेरोजगारीवर तिखट हल्ला करणाऱ्या अभिजीत दीपके यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. दीपके यांनी स्वतः या धमकीचा स्क्रीनशॉट शेअर केल्यामुळे देशात खळबळ माजली आहे. परिणामी, खबरदारी म्हणून पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज येथील त्यांच्या निवास्थानी बंदोबस्त वाढवला आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी काही दिवसांपूर्वी देशातील बेरोजगार तरुणांना कॉकरोच अर्थात झुरळांची उपमा दिली होती. त्याचे सोशल मीडियात तीव्र पडसाद उमटलेत. अभिजीत दीपके नामक छत्रपती संभाजीनगर येथील एका मराठी तरुणाने सरन्यायाधीशांच्या विधानाविरोधात चक्क कॉकरोच जनता पार्टीची स्थापना केली आहे. या पार्टीला सोशल मीडियात मोठा प्रतिसाद मिळाला आहे. या पार्टीच्या फॉलोअर्सची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, प्रस्थापित पक्षाच्या एका कार्यकर्त्याने अभिजीत दीपके यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी खबरदारी म्हणून अभिजीतच्या वाळूज येथील घराबाहेर पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे. याठिकाणी पोलिसांची एक व्हॅनही उभी आहे. विशेष म्हणजे अभिजीतच्या आई-वडिलांशी सध्या कोणताही संपर्क होत नाही. त्यामुळे त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अभिजीत दीपके व त्याच्या कॉकरोच जनता पार्टीविषयी लोकांमध्ये फार उत्सुकता आहे. त्याचे वेगळे पडसाद उमटू नये म्हणून खबरदारीस्तव त्याच्या घराबाहेर पोलिस संरक्षण तैनात करण्यात आले आहे. ही सुरक्षा पुढील काही दिवस अशीच राहील, अशी माहिती संभाजीनगरचे पोलिस उपायुक्त पंकज अतुलकर यांनी दिली.

# मंत्री अदिती तटकरेंचा खासगी सचिव वादात

**मुंबई, २२ मे (वृत्तसंस्था) :** राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या खासगी सचिवावर गंभीर आरोप करण्यात आलेत. त्यांच्यावर महिला अधिकाऱ्यांशी अश्लील भाषेत संवाद साधणे तसेच बदल्यांचे रॅकेट चालवण्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. यामुळे मंत्रालयीन वर्तुळात मोठी खळबळ माजली असून, स्वतः अदिती तटकरेही यामुळे अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी या प्रकरणी अदिती तटकरे यांचे या गायकवाड सोबत काही आर्थिक लागेबांधे आहेत का? असा सवाल उपस्थित केला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, महिला व बालविकास राज्यपत्रित अधिकारी संघटनेने एका निवेदनाद्वारे मंत्री अदिती तटकरे यांचे खासगी सचिव राजेश गायकवाड यांच्याविरोधात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. या तक्रारीत राजेश गायकवाड यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आलेत. संघटनेने आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, राजेश गायकवाड यांच्या गैरवर्तनाबाबत नमूद मुद्दे अत्यंत गंभीर व वस्तुस्थितीदर्शक आहेत. या प्रकरणी तात्काळ दखल घेणे अत्यंत निकडीचे आहे. तसे न झाल्यास अनेक अधिकारी यांची व्यावसायिक हानी व जीवितास गंभीर धोका होईल अशी शक्यता आहे.



अधिकाऱ्यांच्या तक्रारीत काय आहेत आरोप? : राजेश गायकवाड हे स्वतःच्या पदाचा गैरवापर करून मंत्री महोदयांच्या अपरोक्ष गंभीर स्वरूपाचे गैरवर्तन करत आहेत. त्यांचे वर्तन अत्यंत गंभीर व नियमबाह्य आहे. त्याचा अनुभव अनेक अधिकाऱ्यांना आला आहे. पण बरेच अधिकारी व्यावसायिक हानी होण्याची शक्यता व राजेश गायकवाड हे पदाचा गैरवापर करून खोट्या प्रकरणात गोवतील या आशंकेने त्यांचे गैरवर्तन नाईलाजास्तव सहन करत आहेत. महिला अधिकारी यांना अत्यंत अपमानास्पद वागणूक देणे, महिला अधिकारी यांच्याबाबत लज्जास्पद वर्तन करणे, महिला अधिकाऱ्यांना वारंवार अश्लील व घाणेरड्या शब्दांना सामोरे जावे लागणे अशा गंभीर बाबी आहेत. महिलांबाबत राजेश गायकवाड यांचा दृष्टिकोन अत्यंत संकुचित, असंस्कृत, बेजबाबदार व असंवेदनशील आहे. अल्पसंख्यांक व सामाजिक दृष्ट्या वंचित घटकातील अधिकारी यांच्याविषयी राजेश गायकवाड यांचा दृष्टिकोन अत्यंत संकुचित व आकस बुद्धीचा आहे. सामाजिक पार्श्वभूमीवरून अधिकाऱ्यांना अपमानास्पद वागणूक देण्याचे कृत्य संबंधीतांकडून असल्याचे दिसून येते. या अनुषंगाने कार्यरत अधिकारी यांची तक्रार प्राप्त आहेत, असे संघटनेने म्हटले आहे.

## चीनच्या कोळसा खाणीत स्फोट, ९० जणांचा मृत्यू

**बीजिंग, २३ मे (वृत्तसंस्था) :** चीनच्या शांक्सी प्रांतातील एका कोळसा खाणीत झालेल्या भीषण स्फोटात किमान ९० लोकांचा मृत्यू झाला. हा अपघात चीनमधील गेल्या दशकातील सर्वात मोठा कोळसा खाण अपघात मानला जात आहे. सरकारी वृत्तसंस्था शिन्हुआनुसार, शांक्सी प्रांतातील किनयुआन काउंटीमध्ये शुक्रवारी हा स्फोट झाला. हा परिसर बीजिंगपासून सुमारे ५२० किलोमीटर नैऋत्येस स्थित आहे. अपघातापूर्वी खाणीत कार्बन मोनॉक्साइड वायूचा इशारा (अलर्ट) जारी करण्यात आला होता. त्यानंतर काही वेळाने जोरदार स्फोट झाला.

ज्यावेळी स्फोट झाला, त्यावेळी खाणीत २४७ मजूर काम करत होते. अजूनही किती लोक आत अडकले आहेत, हे स्पष्ट झालेले नाही. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, अपघातानंतर लगेचच शिन्हुआने सुरुवातीच्या अहवालात केवळ आठ मृत्यूंची माहिती दिली होती आणि २०० हून अधिक मजुरांना सुरक्षित बाहेर काढण्यात आल्याचे म्हटले होते. नंतर अचानक मृतांची संख्या वाढून ९० झाली असे सांगण्यात आले.

# देशात पेट्रोल ८७ पैसे आणि डिझेल ९१ पैशांनी महागले

**नवी दिल्ली, २३ मे (वृत्तसंस्था) :** देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा वाढ करण्यात आली आहे. दिल्लीत पेट्रोल ८७ पैशांनी महाग होऊन ₹९९.५१ प्रति लिटर झाले आहे. डिझेल ९१ पैशांनी प्रति लिटर महाग झाले आहे. त्याचे दर ₹९२.४९ वर पोहोचले आहेत.


गेल्या ९ दिवसांतील इंधनाच्या दरातील ही तिसरी वाढ आहे. यापूर्वी याच आठवड्यात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सरासरी ९० पैसे प्रति लिटर वाढ करण्यात आली होती. तर, त्यापूर्वी काही दिवसांपूर्वीही दरात ३ रुपये प्रति लिटर वाढ करण्यात आली होती.

या वाढीचे मुख्य कारण आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार आहे. इराण आणि अमेरिकेचे युद्ध सुरू होण्यापूर्वी कच्च्या तेलाचे दर ७० डॉलर होते जे आता वाढून १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले आहेत. कच्च्या तेलाच्या किमती




वाढल्यामुळे तेल कंपन्या दबावाखाली होत्या. त्यामुळे कंपन्यांनी तोट्याची भरपाई करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. जर कच्च्या तेलाच्या किमतीत दीर्घकाळ वाढ कायम राहिली तर पेट्रोल-डिझेलच्या किमती आणखी वाढवल्या जाऊ शकतात.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाची स्थिती यावर आधारित देशात इंधनाचे दर निश्चित केले जातात. सरकारी तेल कंपन्या डेली प्राईस रिव्हिजन म्हणजेच डायनॅमिक प्राईसिंग सिस्टीम अंतर्गत दररोज सकाळी ६ वाजता नवीन दर अपडेट करतात.




गुड इव्हिनिंग City बातम्या तसेच जाहीरातीसाठी संपर्क | प्रकाशक : रणजीतसिंग राजपूत ९८५०३७७३४४ | संपादक : ॲड. हरीदास उंबरकर ९७६३४६११८४ // गुड इव्हिनिंग सिटी सोशल मीडियावर सुद्धा... किंमत १ रू.

# पेट्रोल-डिझेलचा खुलेआम काळाबाजार !

## पंपालगतचे गॅरेज, पंक्चरच्या दुकानांवर मिळतेय पेट्रोल




**बुलढाणा , २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी/राहुल चव्हाण) :** जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर इंधनसाठा संपल्याची परिस्थिती निर्माण झाली असून, पेरणीचे दिवस जवळ आल्याने शेतकरी आणि वाहनचालकांची चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर पेट्रोल आणि डिझेलच्या काळाबाजाराला ऊत आल्याचे चित्र समोर येत आहे. गुड इव्हिनिंग सिटीला प्राप्त पक्क्या माहितीनुसार शहराल-गतच्या दोन ते तीन पेट्रोलपंपाशेजारी असलेल्या गॅरेज, पंक्चरच्या दुकानांवर खुलेआम पेट्रोल-डिझेल बॉटलमध्ये विकले जात असून हा काळाबाजार प्रशासनाने उद्धस्त करण्याची मागणी होत आहे.

आपदा में अवसर या वाक्याचा गैरफायदा घेत काही ठिकाणी पेट्रोलची अवैध विक्री खुलेआम सुरू असल्याची चर्चा आहे. अनेक पेट्रोल पंपांच्या शेजारील पंक्चर दुकाने, वाहन दुरुस्ती ( गॅरेज ) केंद्रे तसेच काही पानटपऱ्यांवर तब्बल १५० ते २०० रुपये प्रतिलिटर दराने पेट्रोल विकले जात असल्याचे नागरिक सांगत आहेत.

काही ठिकाणी तर रात्री उशिरापर्यंत गुपचूप विक्री होत असल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे, अधिकृत दरापेक्षा दुप्पट किंमतीत इंधन विक्री करून काही जण मोठ्या प्रमाणात नफा कमावतात.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंधनाचा काळाबाजार आणि साठेबाजी करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. मात्र, हे आदेश केवळ कागदोपत्रीच राहिल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

नागरिकांनी प्रशासनाने तात्काळ धाडी टाकून काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# शास्त्रीय गायन व कथ्थक नृत्याच्या मैफिलीचे आयोजन





**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी) :** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ,मुंबई द्वारा आयोजित शास्त्रीय गायन तबला आणि कथ्थक नृत्याची प्रशिक्षण कार्यशाळा दिनांक २३ व २४ मे रोजी स्थानिक सहकार विद्या मंदिर बुलढाणा येथे आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेच्या निमित्ताने दिनांक २३ मे रोजी सायं ६.१५ वाजता वाजता सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं.सुधाकर चव्हाण(पुणे) यांची मैफिल व ७.३० वाजता कथ्थक नृत्य शिक्षिका वैशाली दुधे(मुंबई) यांच्या कथ्थक नृत्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. कार्यक्रमात अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबईचे अध्यक्ष प्रा.बाळासाहेब सूर्यवंशी,रजिस्ट्रार विश्वास जाधव यांच्यासह गांधर्व महाविद्यालय मंडळाचे कार्यकारिणी सदस्य देखील उपस्थित राहणार आहेत. मैफिलीकरिता रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्यशाळेच्या आयोजकांनी केले आहे.

# उपनगराध्यक्ष वैशाली खेडेकर यांच्या झाडाझडतीने हादरले प्रशासन !

**चिखली, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी) :** येथील उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून गुरुवारी २२ मे रोजी रात्री उपन-गराध्यक्ष वैशाली खेडेकर यांनी केलेल्या अचानक धडक तपासणीमुळे संपूर्ण आरोग्य प्रशासनात एकच खळबळ उडाली. रात्री सुमारे ११ वाजेच्या दरम्यान करण्यात आलेल्या या झाडाझडतीत रुग्णालयातील धक्कादायक आणि विदारक वास्तव समोर आले. रुग्णालयात ड्युटीवरील डॉक्टर आणि नर्स सेविका अनुपस्थित असल्याने रुग्णांचे अक्षरशः हाल होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. आपत्कालीन परिस्थितीत उपचारासाठी आलेल्या रुग्णांना कोणतीही तत्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध नसल्याने संतप्त वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी शिवसेना नेते कपिल खेडेकर हे देखील उपस्थित होते. रुग्णांची होत असलेली परवड पाहून त्यांनी तीव्र संताप व्यक्त करत, सर्वसामान्य नागरिकांना मरणाच्या दारात सोडून आरोग्य यंत्रणा जबाबदारी झटकत आहे, असा गंभीर आरोप केला. तपासणी दरम्यान रुग्णालयातील प्रशासकीय गोंधळही समोर आला. वैद्यकीय अधिकारी उमर सैय्यद यांचा प्रभार उमेश सावजी यांच्याकडे, तर त्यांचा प्रभार नंदकिशोर जाधव यांच्याकडे असल्याचे सांगितले जात असताना संबंधित अधिकारीही रुग्णालयात उशिराने उपस्थित झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संपूर्ण रुग्णालयात सावळा गोंधळ निर्माण झाल्याचे चित्र होते. रुग्णालयाची अवस्था केवळ सलाईनपुरती मर्यादित झाली असून आज हॉस्पिटलचं ऑपरेशन शिवसैनिकांनीच केलं, अशी संतप्त भावना उपस्थित नागरिक आणि शिवसैनिकांनी व्यक्त केली. अचानक झालेल्या तपासणीमुळे उपस्थित कर्मचाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. यावेळी उपनगराध्यक्ष वैशाली खेडेकर यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून माहिती दिली. तसेच गैरहजर डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

# कमला रोडवर नाल्याचे घाणपाणी घरात; विधवा समिना शेख कुटुंबाचे नुकसान

## ७ दिवसात कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा



**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी) :** टिपू सुलतान चौक ते कमला रोड परिसरातील सांडपाणी नाल्यावर नागरिकांनी अतिक्रमण करून धापे टाकल्याचा प्रकार समोर आला आहे. नगरपरिषदेच्या अतिक्रमण विभागाने केवळ एका बाजूचे धापे काढल्याने पाईपलाईन फुटून साचलेले घाणप-ाणी रस्त्यावर आणि घरांमध्ये शिरल्याची घटना घडली. या पाण्यासोबत कचरा, मलमूत्र तसेच मृत उंदीर वाहून आल्याने परिसरात अस्वच्छता पसरली.

या घटनेत विधवा समिना शेख यांच्या घरात अचानक घाणपाण्याचा लोंढा शिरल्याने घरातील लहान मुले घाबरली. घरातील अन्नधान्य, भाजीपाला आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले. समिना शेख या मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात एका अपंग मुलीसह पाच अपत्यांचा समावेश असून, हे नुकसान त्यांच्यासाठी मोठा आर्थिक धक्का मानला जात आहे. दरम्यान, प्रभाग क्रमांक ३ मध्ये नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असताना योग्य नियोजन न केल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. कमला रोडवरील उर्वरित धापे तातडीने हटवून पीडित कुटुंबाला नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) चे कार्यकर्ते शेख साबीर शेख रहीम यांनी इशारा दिला की, सात दिवसांत धापे हटवून पीडितेला न्याय व नुकसानभरपाई न दिल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल.

# NEET परीक्षा ; विद्यार्थ्यांचे १००% पैसे परत मिळणार



**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी) :** राष्ट्रीय चाचणी केंद्राने NEET परीक्षा घेतली जी पेपरफूट झाल्याने रद्द करण्यात आली. त्याचा तपास सुरूच असून धक्कादायी खुलासे सूरू झाले आहे. मात्र निराश झालेल्या पालक व विद्यार्थ्यांना त्यांचे पैसे परत करण्याचा निर्णय या संस्थेने घेतला आहे.

National Testing Agency (NTA) ने ३ मे रोजी झालेली NEET-UG २०२६ परीक्षा रद्द केल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क (Exam Fee) १००% परत देण्याचा निर्णय घेतला आहे. NTA ने यासाठी अधिकृत वेबसाईटवर फी रिफंड पोर्टल (Fee Refund Portal) सुरू केले आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील अनेक विद्यार्थी नेट कॅफे किंवा इतर व्यक्तींच्या खात्यावरून पैसे भरतात, त्यामुळे पैसे चुकीच्या खात्यात जाऊ नयेत म्हणून NTA थेट पैसे रिव्हर्स न करता विद्यार्थ्यांकडून बँक खात्याची माहिती स्वतः मागवून घेत आहे. तुम्हाला तुमचे शुल्क परत मिळवण्यासाठी २७ मे २०२६ (रात्री ११:५० वाजेपर्यंत) ऑनलाईन पद्धतीने बँक खात्याची माहिती सादर करणे बंधनकारक आहे. रिफंड मिळवण्याची ऑनलाईन प्रक्रिया अधिकृत वेबसाईट neet.nta.nic.in वर जा. तुमचा NEET-UG २०२६ चा ॲप्लिकेशन नंबर (Application Number) आणि पासवर्ड किंवा जन्मतारीख टाकून लॉगिन करा. रिफंड लिंकवर क्लिक करा. डॅशबोर्ड लॉगिन केल्यानंतर डॅशबोर्डवर 'Fee Refu: Window for NEET(UG) २०२६' किंवा 'Refund Link' हा पर्याय दिसेल, त्यावर क्लिक करा. बँक खात्याचा तपशील भरा.

# डिझेलसाठी लांबच लांब रांगा.. प्रशासन म्हणतंय मुबलक साठा



**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी) :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा थेट फटका आता ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसू लागला आहे. पुढील महिन्यापासून खरीप हंगामाच्या पेरण्या सुरू होणार असल्याने सध्या जिल्ह्यात शेतीची कामे वेगाने सुरू आहेत. अशातच अचानक निर्माण झालेल्या डिझेल व पेट्रोलच्या तुटवड्यामुळे शेतकरी पुरता अडचणीत सापडला आहे. एकीकडे राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी इंधनाचा साठा मुबलक असून पुरवठा सुरळीत आहे, अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन केले आहे; परंतु प्रत्यक्ष परिस्थिती मात्र या दाव्याच्या अगदी उलटी असल्याचे चित्र आहे. जर साठा मुबलक आहे, तर पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा का लागत आहेत? असा यक्षप्रश्न आता नागरिक आणि शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

पुढील महिन्यात खरिपाची पेरणी करायची असल्याने सध्या शेतकरी शेताच्या अंतर्गत मशागतीच्या कामात व्यस्त आहे. ट्रॅक्टर आणि इतर यंत्रांसाठी डिझेलची अत्यंत आवश्यकता असतानाच इंधन पुरवठा खंडित झाला आहे. बुलढाणा शहरासह लगतच्या माळविहीर, भादोला, कोलवड, सागवन आणि देऊळघाट येथील पेट्रोल पंपांवर डिझेल-पेट्रोलसाठी वाहनांच्या आणि नागरिकांच्या मैलोन्मैल लांब रांगा लागल्याचे पाहायला मिळत आहे. जिल्ह्यात उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असून, ४० अंशाच्या वर असलेल्या या कडक उन्हात शेतकऱ्यांना आपली शेतीची कामे बाजूला ठेवून तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. या गंभीर परिस्थितीचा गैरफायदा काही समाजकंटकांनी घेण्यास सुरुवात केली आहे. पंपांवरून मोठ्या प्रमाणात इंधनाचा साठा करून ते चढ्या दराने काळ्याबाजारात विकण्याचा गोरखधंदा जिल्ह्यात सुरू झाला आहे. प्रशासनाने आता केवळ पोकळ दावे न करता प्रत्यक्ष मैदानावर उतरून इंधनाचा पुरवठा सुरळीत करावा आणि काळ्याबाजार करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा खरिपाचा हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांची पेट्रोल पंपांवर अचानक भेट; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन



**जिल्ह्यात इंधनाचा तुटवडा असल्याच्या चर्चा आणि नागरिकांमधील संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी आज स्वतः 'क्शन मोड'मध्ये येत जिल्ह्यातील विविध पेट्रोल पंपांना अचानक भेटी दिल्या. या आकस्मिक तपासणीदरम्यान त्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या उपलब्ध साठ्याची तसेच पुरवठा साखळीची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली. नागरिकांना इंधन खरेदी करताना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. गेल्या काही दिवसांत इंधन पुरवठ्याबाबत सोशल मीडियावर पसरलेल्या विविध अफवांमुळे जिल्ह्यातील काही पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत होत्या. ही परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय शहरातील आणि मुख्य महामार्गावरील प्रमुख पेट्रोल पंपांना भेटी दिल्या. त्यांनी थेट पंपावरील व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला आणि 'स्टॉक रजिस्टर'ची सखोल तपासणी केली. तसेच, प्रत्यक्ष भूगर्भातील टाक्यांमध्ये (णपवशीर्सीपव ढरपज्ञी) किती इंधन शिल्लक आहे, याची मोजणी करून घेण्याचे निर्देश दिले. जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. ऑईल कंपन्यांकडून नियमित पुरवठा सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून पेट्रोल पंपांवर विनाकारण गर्दी करू नये. केवळ आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावे. जिल्ह्यात कुठेही इंधनाचा तुटवडा भासणार नाही, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी यावेळी केले.**

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAMAR/2012/46689

# शैक्षणिक सत्रापूर्वी होणार शाळांची मान्सून पूर्व भौतिक सुविधा तपासणी

## शासकीय शाळांसाठी पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट

**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : स्थानिक स्वराज्य संस्था व शासकीय शाळांमधून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी त्यासाठी सर्व शाळांमधून मान्सूनपूर्व भौतिक सुविधांची पडताळणी करण्याबाबतचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी संयुक्तपणे दिले आहेत.

आगामी शैक्षणिक वर्षाच्या पूर्वतयारी , नियोजन व अंमलबजावणीच्या अनुषंगाने शुक्रवारी शिक्षण विभागाअंतर्गत कार्यरत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत हे निर्देश देण्यात आले. जिल्हाधिकारी डॉक्टर प्रवीण कुमार देवरे यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या विशेष उपस्थितीत आयोजित या बैठकीस जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, उपशिक्षणाधिकारीद्वय अनिल देवकर, अकील शेख, जिल्ह्यातील सर्व गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी शाळापूर्व तयारीच्या अनुषंगाने तालुकानिहाय आढावा घेण्यात आला. त्यामध्ये प्रामुख्याने पटनोंदणी, प्रवेशोत्सव, पाठ्यपुस्तके व गणवेश तसेच आवश्यक भौतिक सुविधांची उपलब्धता यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.





स्थानिक स्वराज्य संस्था व शासकीय शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा पट वाढावा यासाठी सर्व पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी किमान दहा टक्के पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट निश्चित करून त्या दृष्टीने यथोचित कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी दिले. शाळेत नव्याने दाखल होत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी पहिला दिवस हा संवेदनशीलतेचा असल्याने पहिले पाऊल या शैक्षणिक उपक्रमाची आनंददायी पद्धतीने अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर यांनी या प्रसंगी दिले.

आपल्या प्रास्ताविकपर मार्गदर्शनात प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी जिल्ह्यातील शाळा व विद्यार्थी संख्या तसेच शिक्षक व अन्य भौतिक सुविधा विषयक आढावा घेऊन सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाच्या दृष्टीने नियोजन आराखडा व अंमलबजावणी बाबत तालुकानिहाय कृती आराखडा निश्चित करण्याबाबत निर्देश दिले, शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाठ्यपुस्तकाचा लाभ देण्यासाठी ची आवश्यक कार्यवाही सुद्धा शाळा स्तरावर पूर्ण करण्यात यावी, समग्र शिक्षा अंतर्गत विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून देण्यात येणार असून याबाबतची कार्यवाही करण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समिती यांना देण्यात आलेले आहेत, सुट्टी लागण्यापूर्वी १००% विद्यार्थ्यांची मापे शाळा स्तरावर घेण्यात आलेली असून कापड खरेदी करणे व गणवेशाचे शिलाई करणे याबाबतचे सर्व अधिकार शासनाने संबंधित शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीला दिलेले आहेत त्यानुसार आवश्यक कार्यवाही पूर्ण करणे बाबतचे निर्देश देखील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपशिक्षणाधिकारी श्री अनिल देवकर यांनी केले.

# २३ जुलैच्या सुनावणीनंतरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची दिशा ठरणार : निवडणूक आयुक्त

**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या २३ जुलैनंतरच्या सुनावणीकडे राज्याचे लक्ष लागले आहे. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून रखडलेल्या २० जिल्हा परिषद आणि १५४ पंचायत समिती निवडणुकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार असून, त्यानंतरच पुढील निवडणूक प्रक्रिया स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन होत असल्याच्या कारणावरून सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी अनेक जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवर आक्षेप घेत काही निवडणुका रद्द केल्या होत्या. न्यायालयाने स्पष्ट निर्देश देत आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त नसावी, तसेच अतिरिक्त जागा सामान्य प्रवर्गासाठी (ओपन कॅटेगरी) खुल्या करण्याचे निर्देश दिले होते. यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या अनेक वर्षांपासून रखडल्या आहेत. आता २३ जुलै रोजी होणारी सुनावणी निर्णायक मानली जात असून, त्या निकालावरच निवडणुका वेळेत होणार की पुन्हा पुढे ढकलल्या जाणार हे अवलंबून असेल, असे वक्तव्य राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केले. सध्या सर्वसामान्य नागरिक, इच्छुक उमेदवार आणि विविध राजकीय पक्षांचे लक्ष सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाकडे लागले आहे.

# मोताळा पंचायत समितीच्या बीडीओ पदी डॉ. रविंद्र सुरूशे



**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : मोताळा पंचायत समितीच्या गटविकास विकास अधिकारी पदी डॉ . रविंद्र सुरूशे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मोताळा पंचायत समितीचा कार्यभार आतापर्यंत प्रभारी गटविकास अधिकारी अशोक काळे यांच्याकडे होता. अशोक काळे यांनी गट विकास अधिकारी असताना लोकाभिमुख प्रशासन राबविण्यावर भर दिला आहे.

घरकुल योजनेचा लाभ प्रत्येक नागरिकापर्यंत पोहचला पाहिजे हा हेतू डोळ्यासमोर ठेवून त्यांनी प्रमाणिक प्रयत्न केले. गट विकास अधिकारी पदाला योग्य तो न्याय देण्याचे काम अशोक काळे यांनी केले. मोताळा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदावर शेगाव पंचायत समितीला कार्यरत असलेले डॉ. रविंद्र सुरूशे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. रविंद्र सुरूशे यांच्या कार्याची दखल घेऊन राज्य शासनाने राज्यपाल, राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्याचे ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथराव डवले यांच्या हस्ते त्यांना यशवंत पंचायतराज पुरस्काराने गौरविले आहे. मोताळा पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी अशोक काळे यांनी आज डॉ. रविंद्र सुरूशे यांच्याकडे कार्यभार सोपविला.

# पिक प्रात्यक्षिके व प्रमाणित बियाणे वितरणासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत अन्नधान्य पिके, भरडधान्य (मका), पौष्टिक तृणधान्य (श्री अन्न) तसेच कडधान्य आत्मनिर्भर अभियान सन २०२६-२७ अंतर्गत पिक प्रात्यक्षिके व प्रमाणित बियाणे वितरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पीक प्रात्यक्षिक गटांचे अर्ज तसेच प्रमाणित बियाणे वितरणासाठी शेतकऱ्यांनी महा-डीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात

**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : स्वराज्य करिअर अकॅडमी, बुलढाणा येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली.



यावेळी अकॅडमीचे संचालक यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांनीही महाराजांना विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाला अकॅडमीमधील सर्व वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहकारी शिक्षक सागर सुरुशे सर यांचीही यावेळी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बावणे सर यांनी केले.

स्वराज्य करिअर अकॅडमी, बुलढाणा ही अकॅडमी मागील वर्षभरापासून बुलढाणा प्राईड बिल्डिंग, दुसरा मजला येथे कार्यरत असून येथे विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल, मेस, क्लासेस तसेच अभ्यासिकेची उत्तम सुविधा उपलब्ध आहे.

# दिव्यांग मुला-मुलींसाठी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू

## ३० जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या मार्फत शासनमान्य तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, ता. देगलुर, जि. नांदेड येथे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी दिव्यांग मुला-मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांसाठी १८ ते ४० वयोगटातील अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध व मतिमंद दिव्यांग विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

प्रशिक्षण केंद्रात विद्युत तारतंत्री, इलेक्ट्रिक डोमेस्टिक उपकरणे दुरुस्ती व सर्व्हिसिंग, मोबाईल रिपेअरिंग अँड सर्व्हिसिंग, फिटर, एलिमेंट ऑफ कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस. ऑफिस, डेस्कटॉप पब्लिशिंग (DTP), कॉम्प्युटर अकाउंटिंग व ऑफिस ऑटोमेशन तसेच अगरबत्ती, खडू व धूपनिर्मिती यांसारखे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

इच्छुक दिव्यांग विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांनी ३० जून २०२६ पर्यंत प्राचार्य, तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलुर, जि. नांदेड येथे अर्ज पाठवावेत किंवा समक्ष भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, भायेगाव रोड, देगलुर, ता. देगलुर, जि. नांदेड येथे किंवा मो.क्रमांकावर ९९६०९००३६९ / ९४०३२०७१०० / ७३७८६४११३६ संपर्क साधावा.

# संगीताचे उपासक प्रत्येक ठिकाणी निर्माण झाले पाहिजे : बालासाहेब सूर्यवंशी

**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : पंडित विष्णू दिगंबर पलूसकर यांनी भारतभर भ्रमंती करून घराघरात संगीत पोहोचवण्याचं काम केलं . अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाची स्थापना त्यांनीच केली . गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या माध्यमातून संगीत परीक्षांचे आयोजन भारतासह इतर काही देशांमध्ये देखील केल्या जाते. यातून संगीताचे विद्यार्थी घडत असतात.प्रत्येक गावात,प्रत्येक घरात संगीत शिक्षक असावा.प्रत्येक विद्यार्थ्यांनी संगीत शिकावे हा ध्यास घेऊन गांधर्व महाविद्यालय मंडळ काम करत असते .संगीताच्या माध्यमातून घडलेले विद्यार्थी कुठल्याही गैरकृत्यात सहभागी होत नाही. संगीत ही एक अशी गोष्ट आहे की ज्यामुळे शांतता लाभू शकते. संगीतामुळेच भारतासह जगातही शांतता लाभू शकते.संगीताचे उपासक हे प्रत्येक ठिकाणी निर्माण झाले पाहिजे, असे प्रतिपादन अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या वतीने आयोजित संगीत शिक्षक, परीक्षक, केंद्र व्यवस्थापक व विद्यार्थी यांच्या कार्यशाळेचे उद्घाटन करतांना अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे अध्यक्ष बालासाहेब सूर्यवंशी यांनी केले.या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ललित कला नृत्य अकादमीच्या छाया तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली कथ्थक नृत्याच्या माध्यमातून गणेश वंदना विद्यार्थिनींनी सादर केली. कथ्थक नृत्याच्या मार्गदर्शिका वैशाली दुधे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की हिंदुस्तानी संगीताची सुरुवात ही द्रुपदापासून झाली आहे. ऋतुजा कुलकर्णी व आर्या महाजन यांनी साडेसात मात्रेच्या निल तालातील गणनाथा गौरी हे द्रुपद कथ्थक नृत्य सादर करून उपस्थित रसिकांची दाद मिळाली. या कार्यशाळेचे आयोजन दिनांक २३ व २४ मे रोजी बुलढाण्यातील सहकार विद्या मंदिर येथे करण्यात आले आहे. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी सरस्वती व पंडित विष्णू दिगंबर पलूसकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपवजलन करून मान्यवरांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. याप्रसंगी व्यासपीठावर मंडळाचे सचिव पं. सुधाकर चव्हाण कोषाध्यक्ष सुनील हुकीर कार्यकारणी सदस्य जनार्धन गुडे, प्रबंध परिषद सदस्य डॉ. अंजुषा पांडवकर,रजिस्ट्रार प्रा. विश्वास जाधव, तबला तज्ञ मार्गदर्शक डॉ.प्रवीण करकरे ,कथ्थक तज्ञ मार्गदर्शक डॉ. वैशाली दुधे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी बोलतांना प्रा. विश्वास जाधव म्हणाले की,अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ हे एका कुटुंबासारखे आहे. या कार्यशाळेच्या निमित्ताने कुटुंबातील सर्व व्यक्तींचे हे एक संमेलन या ठिकाणी आहे. गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या माध्यमातून तीन लाख पेक्षा जास्त विद्यार्थी प्रत्येक सत्रातील संगीत परीक्षांना बसत असतात. यानिमित्ताने अनेक शिक्षक व विद्यार्थी या परिवाराशी जोडल्या गेल्या आहेत अनेक संगीत शिक्षकांचा उदरनिर्वाह या माध्यमातूनच होत असतो.या सर्व बाबींचे श्रेय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे संस्थापक स्व.पंडित विष्णू दिगंबर पलूसकर यांच्याकडे जाते.संगीत हे जनसामान्यांपर्यंत पोहोचावे हाच ध्यास घेऊन हे कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न मंडळाचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी सातत्याने करत असतात. या कार्यशाळेच्या माध्यमातून शिक्षक विद्यार्थी यांना अद्यावत संगीत ज्ञान प्राप्त व्हावे हा उद्देश ठेवून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहेत. कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर झालेल्या पहिल्या सत्रात लय लयकारी लेखन याबाबत डॉ.प्रवीण करकरे व बालासाहेब सूर्यवंशी यांनी विस्तृत मार्गदर्शन करून लय व लयकारी यांचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कैलास कोल्हे यांनी केले तर सूत्रसंचालन भगवान राईतकर यांनी केले. या कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून २५० पेक्षा जास्त संगीत शिक्षक, केंद्र व्यवस्थापक व प्रशिक्षक उपस्थित आहेत. कार्यशाळेच्या आयोजनासाठी कैलास कोल्हे, अरविंद टाकळकर, के.जे. तायडे यांचेसह बुलढाणा शहरातील सर्व संगीत शिक्षकांनी पुढाकार घेतला आहे.



# 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन' उत्साहात

**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : जिल्हाधिकारी कार्यालयात आज दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन' साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, समाधान गायकवाड यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांना 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ' दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**जाहिरनामा**

**तहसिलदार, देऊळगावराजा यांचे न्यायालय**

क्रमांक कावि/जन्म-मृत्यू/६१८
दिनांक २२/५/२०२६

**१. विकास सखाराम जाधव रा. देऊळगावराजा ता. देऊळगावराजा, जि.बुलढाणा यांचा अर्ज**
**२. जन्म-मृत्यू नोंदणी, नगर परिषद देऊळगावराजा यांचेकडील अनुपलब्धता प्रमाणपत्र.**

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांची स्वतः जन्माची नोंद करण्याकरीता आदेश मिळावा याबाबत विनंती केली आहे. अर्जदार यांचे अर्जासोबत सहपत्रीत दस्तऐवजाचे अवलोकन केले असून अर्जदार विकास सखाराम जाधव यांचा जन्म हा दि. ०५/०१/१९६७ रोजी मौजे देऊळगावराजा येथे झाल्याचे नमूद केले असून अर्जदार यांना तसेच प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर नोंदीबाबत कोणालाही हरकत आक्षेप असल्यास त्यांनी निम्न स्वाक्षरीतासक्षम स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून दिनांकापूर्वी सादर करावे, दिनांक २२/०६/२०२६ नंतर कोणतेही हरकत आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

-स्वाक्षरी-
तहसिलदार, देऊळगावराजा

# अंतर्मन

## श्रावणात दोन ग्रहणे!; या वर्षातील शेवटचे सूर्यग्रहण अन् चंद्रग्रहण कधी?

या वर्षातील शेवटचे चंद्रग्रहण आणि सूर्यग्रहण श्रावण महिन्यात होणार आहेत. भगवान शिवाच्या पवित्र महिन्यात होणारी ही ग्रहणे अनेक प्रकारे विशेष मानली जातात. पंडित राकेश झा यांनी स्पष्ट केले, की पंचांगानुसार, सूर्यग्रहण १२ ऑगस्ट रोजी अमावस्येच्या दिवशी, तर चंद्रग्रहण २८ ऑगस्ट रोजी पौर्णिमेच्या दिवशी होईल. आपल्या पूर्वजांच्या शांतीसाठी ग्रहणाच्या दिवशी दानधर्म करता येतो. हे लक्षात घ्यावे की, दोन्ही ग्रहणे भारतात दिसणार नाहीत. १२ ऑगस्ट रोजी सूर्यग्रहण भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री ८:०४ वाजता सुरू होईल आणि पहाटे १:०७ वाजता संपेल. तर, २८ ऑगस्ट रोजी चंद्रग्रहण भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी ८:०४ वाजता सुरू होईल आणि सकाळी ११:२२ वाजता संपेल.



# मोदींना आव्हान देण्याची ताकद थलपती विजय यांच्यात किती?

## ज्योतिषी उघड करतात, कोणाची कुंडली अधिक बलवान!

**थलपती विजय हे तामिळनाडूचे मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांची तुलना आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री एन.टी. रामाराव आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी केली जात आहे. काही ज्योतिषांनी तर असेही म्हटले आहे की ते नरेंद्र मोदींना आव्हान देऊ शकतात. चला, ज्योतिषी सचिन मल्होत्रा यांच्याकडून जाणून घेऊया की थलपती विजय आणि नरेंद्र मोदी यांच्या कुंडलीत काय साम्य आहे आणि विजय यांची कुंडली मोदी यांच्याइतकीच बलवान आहे का?**

थलपती विजय यांची तुलना राजकीय वर्तुळात आंध्र प्रदेशचे तीन वेळा मुख्यमंत्री राहिलेले आणि तेलुगू सिनेमाचे सुपरस्टार एन. टी. रामाराव (जन्म २८ मे १९२३, दुपारी ४:४३, गुडीवाडा, आंध्र प्रदेश) यांच्याशी केली जात आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी तामिळ सिनेमाचे सुपरस्टार विजय यांनी 'तमिळगा वेत्री कळघम' (TVK) हा पक्ष स्थापन केला आणि विधानसभा निवडणुकीत १०८ जागा जिंकून सर्वांना आश्चर्यचकित केले. तामिळनाडू विधानसभेच्या गणितानुसार, सुपरस्टार विजय यांच्या TVK पक्षाला बहुमत मिळवण्यासाठी ११८ आमदारांच्या पाठिंब्याची गरज होती. तथापि, विजय यांच्या करिष्म्यामुळेच AIADMK पक्षाचे २२ आमदार आपल्या पक्षाविरुद्ध बंड करून त्यांच्या पक्षात सामील झाले आणि विजय यांनी विधानसभेत १४४ आमदारांचा पाठिंबा मिळवून सर्वांना चकित केले. जवळपास ४० वर्षांपूर्वी २९ मार्च १९८२ रोजी आंध्र प्रदेशात तत्कालीन तेलुगू चित्रपट सुपरस्टार एन. टी. रामाराव यांनी तेलुगू देसम पार्टीची (टीडीपी) स्थापना केली आणि अवघ्या नऊ महिन्यांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून ९ जानेवारी १९८३ रोजी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. एन. टी. रामाराव तिथेच थांबले नाहीत तर १९८४ च्या अखेरीस तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर झालेल्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाने आंध्र प्रदेशातील ३४ पैकी ३० लोकसभा जागा जिंकल्या आणि राष्ट्रीय राजकारणातही मोठे स्थान मिळवले.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय (जन्म २२ जून १९७४, सकाळी ९:२५ वाजता, चेन्नई, तामिळनाडू) यांच्या जन्मपत्रिकेत चंद्र आणि मंगळाचा बलवान राजयोग आहे, जो पंतप्रधान नरेंद्र मोदी (जन्म १७ सप्टेंबर १९५०, सकाळी ११ वाजता, वडनगर, गुजरात) यांच्या जन्मपत्रिकेसारखाच आहे. यामुळे दक्षिण भारतीय ज्योतिष विश्वात, भविष्यात केंद्रात मोदींना आव्हान देणारे नेते म्हणून त्यांना सादर केले जात आहे. ज्योतिषशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास सी. जोसेफ विजय यांच्या राजकीय कारकिर्दीत काही आश्चर्यकारक शक्यता दडलेल्या आहेत.

### भाजपला आव्हान देऊ शकतील?

पंतप्रधान मोदींना कुंडलीतील गजकेसरी योग, अमलकीर्ती योगांनी मोठ्या उंचीवर पोहोचवले आहे. प्रथम त्यांनी तीन वेळा गुजरातचे मुख्यमंत्रीपद भूषवले आणि आता त्यांना सलग तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या जन्मपत्रिकेत चंद्र आणि मंगळ या सर्वात शुभ ग्रहांची विंशोत्तरी दशा योग्य वेळी लाभली, ज्यामुळे त्यांना तीन लोकसभा निवडणुका जिंकता आल्या. दुसरीकडे, सी. जोसेफ विजय यांच्या जन्मपत्रिकेत या योगांचा अभाव आहे आणि ते सध्या शुक्रातील शनीच्या कठीण काळातून जात आहेत, त्यामुळे ज्योतिषशास्त्रानुसार, नजीकच्या भविष्यात ते केंद्रात भाजपला आव्हान देतील अशी शक्यता नाही. तथापि, एन. टी. रामाराव यांच्याप्रमाणेच तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांना विंशोत्तरी दशेसह शुक्राच्या दीर्घकाळ टिकणाऱ्या 'धन योगा'चा लाभ मिळत आहे. यामुळे ते आपल्या राजकीय कारकिर्दीत एकापेक्षा जास्त वेळा मुख्यमंत्री बनू शकतील. तामिळनाडू लोकसभा निवडणुकीतील त्यांच्या पक्षाच्या दमदार कामगिरीमुळे ते भविष्यात दक्षिण भारतातील एक प्रमुख नेते म्हणून प्रस्थापित होऊ शकतात.

### शकट योगामुळे संघर्ष

थलपती विजय यांच्या जन्मपत्रिकेतील बलवान राजयोगामुळे ते दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठे आणि सर्वात महागडे अभिनेते बनले आहेत. तथापि, राजकीय दृष्टिकोनातून पाहिल्यास त्यांच्या कुंडलीत चंद्रापासून आठव्या स्थानातील गुरू 'शकट योग' तयार करत आहे, जो मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात काही संघर्षाचे संकेत देतो. सत्तेचे प्रतीक असलेला सूर्य, हानीच्या बाराव्या स्थानात असून, गुलिकासोबत समान अंशांवर युती करत आहे. शिवाय सूर्याने शनीला अस्तंगत केले आहे, ज्यामुळे शत्रूंचे अडथळे आणि अंतर्गत घातपाताचा योग तयार झाला आहे. २०२९-३० या वर्षात शुक्रात शनीच्या विंशोत्तरी दशेत, त्यांना त्यांच्याच पक्षातील काही नेत्यांमुळे राजकीय नुकसान सोसावे लागण्याची शक्यता आहे.

# दरवाजामागे कपडे टांगतात? जरा 'हे' वाचा, वास्तुदोष अन् आर्थिक अडचणी होतात निर्माण!



**घरात प्रवेश करताच आपण दरवाजामागील हुकांवर शर्ट, पर्स, जॅकेट इत्यादी टांगतो. हे सामान्य असले तरी, वास्तूशास्त्रानुसार हे योग्य मानले जात नाही. मुख्य दरवाजाच्या किंवा इतर कोणत्याही दरवाजांच्या मागे कपडे टांगणे शुभ नाही. असे केल्याने घरात नकारात्मक ऊर्जा निर्माण होऊ शकते आणि आर्थिक सुस्थितीवर परिणाम होऊ शकतो. वास्तुदोष निर्माण होऊ शकतात. चला, दारामागील जागेसंबंधित महत्त्वाचे वास्तु नियम आणि टिप्स सविस्तरपणे जाणून घेऊया...**

### या वस्तू दारामागे नकोच

» झाडू आणि फरशी पुसण्याचे कापड : जर तुम्ही तुमच्या कोणत्याही दारामागे झाडू आणि फरशी पुसण्याचे कापड ठेवत असाल, तर तुम्ही ही सवय ताबडतोब बदलली पाहिजे. वास्तूनुसार, दारामागे झाडू आणि फरशी पुसण्याचे कापड ठेवल्याने देवी लक्ष्मी क्रोधित होऊ शकते. यामुळे घरात आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात.

» फाटलेले आणि जुने कपडे : तुमच्या दारामागे फाटलेले किंवा जुने कपडे कधीही टांगू नका. असे मानले जाते की असे केल्याने आर्थिक अडचणी येऊ शकतात आणि नकारात्मक ऊर्जा वाढते.

» कचरा किंवा डस्टबीन : दारामागे कोणत्याही प्रकारचा जमा झालेला कचरा कधीही ठेवू नका. त्यामुळे, दारामागे कचरापेटी कधीही ठेवू नका. असे केल्याने घरातील सकारात्मक वातावरणावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

» बूट आणि चप्पल : वास्तूनुसार, दारामागे बूट आणि चप्पल ठेवल्याने घरातील शांतता आणि आनंदात व्यत्यय येऊ शकतो.

### या गोष्टी लक्षात ठेवा...

» जागेच्या कमतरतेमुळे तुम्हाला दारामागे कपडे टांगावे लागत असतील, तर तिथे नेहमी धुतलेले आणि स्वच्छ कपडेच टांगा. दारामागे कधीही घाणेरडे किंवा वापरलेले कपडे टांगू नका.

» रात्रीच्या वेळी दारामागील जागेतील सर्व वस्तू काढून टाकाव्यात. रात्रीच्या वेळी ती जागा रिकामी ठेवणे योग्य मानले जाते.

» शक्य असल्यास दारामागे फक्त हलक्या रंगाचे कपडे टांगावेत. तिथे काळे, निळे किंवा इतर गडद रंगाचे कपडे कधीही टांगू नका.

» दारामागे कपडे टांगताना ते इतके जड नसावेत की त्यामुळे दार उघडण्यास अडथळा येईल, कारण दार पूर्णपणे उघडणे आवश्यक मानले जाते.

### महत्त्वाच्या वास्तू टिप्स

» नेहमी स्वच्छ ठेवा : तुमच्या घरातील प्रत्येक दार नेहमी स्वच्छ राहील याची खात्री करा. दारामागे असलेली घाण नकारात्मकता आकर्षित करू शकते.


» पुरेसा प्रकाश : तुम्ही दार उघडल्यावर दारामागील जागेत पुरेसा प्रकाश येईल याची खात्री करा.

» दारातून कोणताही आवाज येऊ नये : वास्तूशास्त्रानुसार, दार उघडताना किंवा बंद करताना कोणताही आवाज येऊ नये. यामुळे वास्तू दोष निर्माण होऊ शकतात.

### दारामागे कपडे का नको?

» आपल्या घराचे किंवा खोलीचे दार हे प्रगतीचे प्रवेशद्वार आहे. म्हणून, त्यामागे कपडे टांगल्याने करिअर आणि कामात अडचणी आणि अडथळे येऊ शकतात.

» वास्तुशास्त्रानुसार, दारामागे कपडे टांगल्याने कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.



# बिझनेस

## गुगल मॅप्स... बुडणाऱ्या स्टार्टअपने कसे कमवायला सुरू केले 1,00,00,00,00,000...

**रस्त्यांवर आणि गल्ल्यांत मार्गदर्शन करणारे गुगल मॅप्स गेल्या ८ फेब्रुवारीला २१ वर्षांचे झाले. ते ८ फेब्रुवारी २००५ रोजी लाँच झाले होते. त्याची स्थापना लार्स आणि जेन्स रासमुसेन नावाच्या दोन भावांनी केली होती. या दोन भावांच्या या स्टार्टअपने चांगली कामगिरी केली नाही आणि तो बुडू लागला. गुगलचे संस्थापक लॅरी पेज त्यांच्या मदतीला धावले. त्यांची कंपनी गुगलने ते विकत घेतले आणि वेब ब्राउझरसाठी ते विकसित केले, त्याला गुगल मॅप्स असे नाव दिले. सुरुवातीला, ते फक्त एक डेस्कटॉप प्रोग्राम होते, परंतु उपग्रह तंत्रज्ञानामुळे नेव्हिगेशनचा मार्ग कायमचा बदलला.**

» ऑस्ट्रेलियन कंपनीने केले लाँच : त्यावेळी MapQuest चे युग होते. त्यावेळी फक्त दिशानिर्देशांसह चौकोनी नकाशे मिळत होते. त्यानंतर, ऑस्ट्रेलियन स्टार्टअप कंपनी Where2 ने स्क्रीनच्या मध्यभागी नकाशा ठेवण्याचा विचार केला. लोक नकाशा फिरवून पाहू शकत होते, की ते कुठे आहेत... आज हे छान वाटते, परंतु त्यावेळी कोणालाही ते आवडले नाही... Sequoia Capitalने Where2 मध्ये गुंतवणूक केली. पण नंतर त्यांनी त्यांचे निधी काढून घेतले. ज्यामुळे Where2 ला रातोरात निधी गमवावा लागला. मात्र हे करताना Sequoia Capitalने गुगल संस्थापक लॅरी पेजची भेट Where2 च्या संस्थापकांशी घालून दिली. Where2 चे तंत्रज्ञान सुरुवातीला एक्सपिडिशन नावाचे डेस्कटॉप ॲप म्हणून सुरू झाले होते. त्यासाठी डाउनलोडची आवश्यकता होती, परंतु लॅरी पेजला ते आवडले नाही. तो म्हणाला, आम्हाला वेब आवडते आणि त्याचे ॲप ब्राउझरमध्ये बिल्ट करण्यासाठी एक अंतिम मुदत निश्चित केली.

» लाँच होण्याच्या एक दिवस आधी लीक... : युझर्सना ते सोपे करण्यासाठी अनेक बदल करण्यात आले. गुगल मॅप्स अधिकृत लाँच होण्याच्या एक दिवस आधी ७ फेब्रुवारी २००५ रोजी लीक झाले. ड्रॅग करण्यायोग्य नकाशे आणि डिझाइन पाहून लोक आश्चर्यचकित झाले. तथापि, सुरुवातीच्या १ कोटी व्ह्यूजनंतर, त्याचा वापर कमी झाला. नंतर, गुगलने हळूहळू त्याचे डेव्हलपर टूल्स रिलीज केले आणि एक फिचर्स लाँच केले ज्यामुळे लोकांना गुगल मॅप्समध्ये त्यांचे घर शोधता आले. गुगल मॅप्सचे हे वैशिष्ट्य प्रचंड लोकप्रिय झाले. एक वर्षानंतर २००६ मध्ये गुगल मॅप्स जगातील सर्वात मोठे मॅप प्रदाता बनले. आज गुगल मॅप्स स्मार्टफोनवर सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या ॲप्सपैकी एक आहे.


» किती महसूल आणि तो कसा कमावला जातो? : आज गुगल मॅप्स ही पालक कंपनी अल्फाबेटसाठी एक मुख्य साधन आहे. दरवर्षी तिचा महसूल वाढत आहे. मीडिया रिपोर्टनुसार, २०१९ मध्ये त्याचे उत्पन्न ३ अब्ज अमेरिकन डॉलर्स होते, परंतु २०२३ पर्यंत ते अंदाजे ११.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स (१ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त) पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. यावरून असे दिसून येते की लोक आता गुगल मॅप्सला फक्त नेव्हिगेशन ॲपपेक्षा जास्त मानतात. ते स्थान-आधारित सेवांसाठी एक प्रमुख व्यासपीठ बनले आहे. गुगल मॅप्सवर अनेक प्रकारच्या जाहिराती प्रदर्शित केल्या जातात आणि डेव्हलपर्सना प्रीमियम API वापरण्यासाठी पैसे द्यावे लागतात. गुगल मॅप्सच्या एकूण उत्पन्नापैकी किमान ८२% जाहिरातींमधून येतात. गुगल मॅप्सच्या उत्पन्नाचा मोठा भाग नेव्हिगेशनमधून येतो. गुगल मॅप्स नेव्हिगेशन वापरणाऱ्या व्यवसायांना शुल्क आकारते. कंपन्या गुगल मॅप्सवर त्यांची दुकाने, रेस्टॉरंट्स किंवा सेवा केंद्रे प्रमोट करण्यासाठी गुगलला पैसे देतात. गुगल मॅप्स प्रमोटेड पिन आणि वैयक्तिकृत जाहिरातींद्वारे देखील महसूल निर्माण करते. उदाहरणार्थ, जर तुम्ही गुगल मॅप्सवर माझ्याजवळील सर्वोत्तम कॉफी शॉप्स शोधले तर गुगल मॅप्स प्रथम प्रमोट केलेले रेस्टॉरंट प्रदर्शित करते. यासाठी ते कंपन्यांना शुल्क आकारते.

### हे ॲप टॉप 3 मध्ये

जुलै २०२४ मध्ये जगभरात सर्वाधिक डाउनलोड केलेल्या गुगल ॲप्समध्ये गुगल मॅप्स तिसऱ्या क्रमांकावर होते, अंदाजे १२ दशलक्ष डाउनलोड्स होते. २०२३ मध्ये, गुगल मॅप्स हे युनायटेड स्टेट्समध्ये सर्वाधिक डाउनलोड केलेले नेव्हिगेशन ॲप होते, ज्याचे १० दशलक्षाहून अधिक डाउनलोड्स होते, तर वेझ ९.८९ दशलक्ष डाउनलोड्ससह दुसऱ्या क्रमांकावर होते.

### मल्टीपल प्लॅटफॉर्म्सकडून स्पर्धा

आज डिजिटल मॅपिंग क्षेत्रात अनेक प्लॅटफॉर्म गुगल मॅप्सशी स्पर्धा करत आहेत. यामध्ये वेझ, ॲपल मॅप्स, HERE WeGo, OpenStreetMap, TomTom, Mapbox, MapQuest आणि MapmyIndia/Mappls यांचा समावेश आहे. वेझ हे गुगलच्या मालकीचे आहे परंतु ते स्वतंत्रपणे काम करते. हे रिअल-टाइम, वापरकर्त्यांने गोळा केलेला ट्रॅफिक डेटा, अलर्ट आणि इतर माहिती प्रदान करणारे एक आघाडीचे ॲप आहे. भारतात, बरेच लोक गुगल मॅप्स व्यतिरिक्त मॅपमाय इंडिया वापरतात.



## फक्त 90 रुपयांत कॅन्टीनमध्ये काम करण्यापासून ते आता 5,000 कोटी रुपयांच्या साम्राज्याचे मालक होण्यापर्यंत...

# नशीब कसे बदलले?



चंदुभाई विराणी यांची कहाणी एखाद्या चित्रपटाच्या पटकथेपेक्षा कमी नाही. ते एकेकाळी फक्त ९० रुपये महिन्याला सिनेमा हॉल कॅन्टीनमध्ये काम करत होते. आज ते ५००० कोटी रुपयांच्या बालाजी वेफर्स साम्राज्याचे मालक आहेत. ही कथा त्यांच्या कठोर परिश्रम, दृढनिश्चय आणि सामान्य सुरुवातीपासून ते मोठ्या व्यवसाय उभारणीपर्यंतच्या प्रेरणादायी प्रवासाचे दर्शन घडवते.

### फक्त दहावीपर्यंत शिक्षण

चंदूभाई विराणींची कहाणी अनेकांसाठी प्रेरणास्रोत आहे. सामान्य परिस्थितीतून त्यांनी उदयास येऊन एक मोठा व्यवसाय उभारला. त्यांचे शिक्षण फक्त दहावीपर्यंत झालेले आहे. त्यांनी स्थापन केलेले बालाजी वेफर्स भारतातील आघाडीच्या स्नॅक ब्रँडपैकी एक आहे. सध्या या व्यवसायाची किंमत अंदाजे ५,००० कोटी आहे. यावरून हे सिद्ध होते की मोठ्या स्वप्नांसाठी मोठ्या सुरुवातीची आवश्यकता नसते.

### 2 वर्षांतच अपयशी

दुर्दैवाने, हा उपक्रम दोन वर्षांतच अपयशी ठरला. स्थिर उत्पन्नाशिवाय जीवन अधिकाधिक कठीण होत गेले. भावांना त्यांना मिळेल ते काम शोधावे लागले. व्यवसाय कोसळल्यानंतर चंदूभाई आणि त्यांचे भाऊ राजकोटच्या सिनेमाच्या कॅन्टीनमध्ये काम करू लागले. चंदूभाई दरमहा फक्त ९० रुपये कमवत होते. ते दरवाज सांभाळण्यापासून ते पोस्टर चिकटवण्यापर्यंत आणि ग्राहकांना मार्गदर्शन करण्यापर्यंत सर्व काही करत असत. घराचे ५० रुपये भाडे भरण्यासाठीही त्यांच्याकडे पैसे नसायचे.

### 15 व्या वर्षी व्यवसाय

१९७२ मध्ये वयाच्या १५ व्या वर्षी चंदूभाई विराणी त्यांच्या कुटुंबासह राजकोटपासून सुमारे ७९ किलोमीटर अंतरावर असलेल्या जामनगर जिल्ह्यातील धुंडोराजी येथे स्थलांतरित झाले. त्यांना मेघजीभाई आणि भिखुभाई असे दोन भाऊ होते. त्यांचे वडील दिवंगत पोपट विराणी यांनी त्यांची नापीक जमीन विकली आणि त्यांच्या मुलांना त्यांचे जीवन सुरू करण्यासाठी २०,००० रुपये दिले. या पैशाचा वापर करून भावांनी राजकोटमध्ये शेती उत्पादने आणि शेतीच्या उपकरणांचा व्यापार करून एक छोटासा व्यवसाय सुरू केला.



### संधीचे केले सोने...

सिनेमा कॅन्टीनमध्ये काम करत असताना चंदूभाईंना लक्षात आले की बटाट्याचे वेफर्स चित्रपट पाहणाऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. त्यांनी ही संधी ओळखली. त्यांनी सुमारे १०,००० रुपयांच्या गुंतवणुकीतून त्यांच्या अंगणात एक लहान शेड उभारला. त्यांनी त्यांच्या एका खोलीच्या घरात चिप्स बनवण्याचा प्रयोग सुरू केला. त्यांचे चिप्स लवकरच लोकप्रिय झाले, केवळ सिनेमा हॉलमध्येच नव्हे तर बाहेरही पसरले.

### 50 लाख रुपयांचे कर्ज

मागणी वाढताच चंदूभाईंनी १९८९ मध्ये राजकोटच्या अजी जीआयडीसीमध्ये गुजरातमधील त्यावेळचा सर्वात मोठा बटाटा वेफर उत्पादन युनिट सुरू केला. त्यांनी ५० लाख रुपयांचे बँक कर्ज घेतले. १९९२ मध्ये, तिन्ही भावांनी अधिकृतपणे बालाजी वेफर्स प्रायव्हेट लिमिटेडची स्थापना केली. त्यांच्या खोलीत ठेवलेल्या भगवान हनुमानाच्या एका लहान मूर्तीवरून कंपनीचे नाव ठेवण्यात आले.

### आज एक वेगळी ओळख प्रस्थापित

आज, बालाजी वेफर्स हे भारतातील टॉप स्नॅक ब्रँडपैकी एक आहे. ते मोठ्या उत्पादन क्षमतेसह चार कारखाने चालवते. कंपनी दरवर्षी ६.५ दशलक्ष किलो बटाटे आणि १ कोटी किलो नमकीनवर प्रक्रिया करते. ते दर तासाला



३,४०० किलो चिप्सचे उत्पादन करते. भारताच्या ४३,८०० कोटी रुपयांच्या स्नॅक मार्केटमध्ये १२% वाटा असलेली, बालाजी वेफर्स ही देशातील तिसरी सर्वात मोठी स्नॅक कंपनी बनली आहे. कंपनीची उलाढाल हजारो कोटींवर पोहोचली आहे.

सायंदैनिक
# गुड इव्हिनिंग City
२३ मे २०२६, शनिवार




## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात जनुना ग्रामपंचायतला १२ लक्ष रुपयांचा द्वितीय पुरस्कार







**खामगांव, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६' अंतर्गत तालुक्यातील जनुना गावाची जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीकडून सविस्तर पाहणी करण्यात आली. शाश्वत विकासाची ध्येय गाठण्यासाठी गावाने केलेल्या प्रयत्नांचे यावेळी कौतुक करत जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीने गावातील विविध विकासकामांची दखल घेत ग्रामपंचायतला तालुकास्तरीय द्वितीय पुरस्कारासाठी निवड करत द्वितीय १२ लक्ष रुपयांचा पुरस्कार ग्रामपंचायला घोषित करण्यात आला.

यावेळी गावविकासाचा आढावा घेत समितीने गावातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली होती. प्रामुख्याने स्वच्छता व पाणी व्यवस्थापन, आणि सुशासन या घटकांवर भर देण्यात आला असून गावात वृक्षारोपण आणि सांडपाणी व्यवस्थापनात केलेल्या कामांची समितीने नोंद घेतली.शासकीय योजनांची १००% अंमलबजावणी करत ग्रामपंचायतने केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना जसे की घरकुल योजना, आयुष्यमान भारत, आणि मनरेगा अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे का, याची पडताळणी करण्यात आली. ग्रामपंचायतीचे दप्तर व्यवस्थापन आणि पारदर्शक कारभाराबाबतही समितीने समाधान व्यक्त केले. गावाचा विकास हा केवळ सरकारी निधीवर अवलंबून नसून त्यात ग्रामस्थांचा सहभाग महत्त्वाचा असतो, असे मत पाहणी समितीने व्यक्त केले.या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामपंचायतींमध्ये निकोप स्पर्धा निर्माण करणे हा आहे. या अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्य स्तरावर मोठी बक्षिसे जाहीर करण्यात आली असून, जनुना गावाने या स्पर्धेत आपली दावेदारी प्रबळ केली होती. माहिती व जनसंपर्क महासंवाद आणि महाराष्ट्र ग्रामविकास विभाग यांच्या निर्देशानुसार हे मूल्यमापन चालणार होते.या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतांना तालुका स्तरावर प्रथम १५ लाख, द्वितीय १२ लाख तर तृतीय ८ लाखाचे बक्षीस मिळणार आहे. यावेळी जिल्हास्तरीय समितीमध्ये गटविकास अधिकारी सुहास जाधव, विस्तार अधिकारी प्रभाकर वाघ, शिक्षणाधिकारी भोडापे, बालविकास अधिकारी खेळकर, ऑपरेटर वासनिक यांनी पाहणी करत गावविकासासाठी झटणाऱ्या ग्रामपंचायत प्रशासक अस्मिता गव्हांदे, ग्रामविकास अधिकारी आर. एम. दांडगे यांच्यासह , ग्रामपंचायत सदस्य आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थांचे यावेळी कौतुक केले.

### खामगाव ग्रामीण पोलिसांची तत्परता!
## तीन महागडे मोबाईल शोधून मालकांच्या केले स्वाधीन



**खामगाव, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : ग्रामीण पोलीसांनी तत्परता व तांत्रिक तपासाच्या जोरावर हरव-लेले तीन मोबाईल शोधून संबंधित मालकांच्या ताब्यात दिले. या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत ग्रामीण पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अटाळी येथील विजय गजानन कुटे यांचा Vivo Y33 हा मोबाईल १५ डिसेंबर २०२५ रोजी हरवला होता. याप्रकरणी तक्रार दाखल झाल्यानंतर ग्रामीण पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. अखेर १९ मे २०२६ रोजी संबंधित मोबाईल शोधून मालकाच्या ताब्यात देण्यात आला.तलाव रोड येथील मवीन शंकरलाल पटेल यांचा Samsung M56 हा मोबाईल २२ जानेवारी २०२६ रोजी हरवला होता. पोलिसांनी सातत्याने शोधमोहीम राबवत संबंधित मोबाईलचा माग काढला व १९ मे २०२६ रोजी तो मूळ मालकाला परत करण्यात आला.तसेच नागापूर येथील गौरव ज्ञानदेव धानोरे यांचा Redmi Note 14 हा मोबाईल ३० एप्रिल २०२६ रोजी हरवला होता. तांत्रिक तपास आणि शोधकारवाईच्या आधारे हा मोबाईलही पोलिसांनी हस्तगत करून संबंधित व्यक्तीस परत केला.ग्रामीण पोलिसांच्या या यशस्वी कारवाईमुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून, हरवलेल्या वस्तूंबाबत त्वरित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक किशोर तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी प्रविण जाधव यांनी केली.

## महाराणाजींचे जीवन, स्वाभिमान, त्याग आणि राष्ट्रभक्तीचे प्रतिक : दिलीपकुमार सानंदा



**खामगाव, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : हिंदु स्वाभिमान महाराणा प्रतापसिंह यांनी प्रतिकुल परिस्थितीमध्ये देश,धर्माच्या रक्षणासाठी जे कार्य केले त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. महाराणा प्रतापसिंह यांचे जीवन स्वाभिमान,त्याग आणि राष्ट्रभक्तीचे प्रतिक आहे. तरुण पिढीने महाराणाजींच्या संघर्ष आणि देशप्रेमापासुन तरुण पिढीने प्रेरणा घ्यावी असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले. खामगाव तालुक्यातील बोरजवळा येथे हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त महाराणा मंडळ व शिवप्रताप संघटनेच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली त्याप्रसंगी बोलतांना त्यांनी उपरोक्त आवाहन केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठनेते पंजाबरावदादा देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे खामगाव तालुका अध्यक्ष मनोज वानखडे, खामगाव कृ.उ.बा.स.संचालक विलाससिंग इंगळे, दुर्गासिंग ठाकुर, नंदुसिंग तोमर, कल्याणसिंग तोमर, पंजाबसिंग तोमर, धिरज तोमर, रोहित तोमर, अभिजीतसिंग तोमर, गणेश वावगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम सानंदा यांच्या हस्ते आकर्षक रथामध्ये असलेल्या महाराणाजींच्या अर्धाकृती पुतळयाचे पुजन करुन माल्यार्पण करुन आरती करण्यात आली. तद्नंतर शोभायात्रेचा शुभारंभ करण्यात आला. या शोभायात्रेमध्ये बोरजवळा येथील महाराणा मंडळ व शिवप्रताप संघटनेचे तरुण कार्यकर्ते व राजपुत समाज बांधव मोठया संख्येने सहभागी झाले होते.




## बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर 'युवा हिंदू प्रतिष्ठान'चे तीनही पोलीस ठाण्यांना निवेदन

### अवैध गोहत्या व गौतस्करीला पूर्णपणे पायबंद घालण्याची मागणी निवेदन



**बुलढाणा, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर परिसरात कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी आणि अवैध गोहत्या व गौतस्करीला पूर्णपणे पायबंद घालण्यात यावा, यासाठी आज 'युवा हिंदू प्रतिष्ठान'च्या वतीने पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी खामगाव शहर, ग्रामीण आणि छत्रपती शिवाजी नगर पोलीस स्टेशनच्या ठाणेदारांची भेट घेऊन त्यांना संयुक्त निवेदन सादर केले.

या निवेदनात त्यांनी शहराच्या आणि ग्रामीण भागाच्या सर्व मुख्य प्रवेशद्वारांवर व मार्गांवर २४ तास कडक पोलीस नाकेबंदी लावण्यात यावी.संशयास्पद आणि संवेदनशील मानल्या जाणाऱ्या भागांत रात्री २ ते पहाटे ६ या वेळेत पोलिसांची विशेष गस्त वाढवण्यात यावी. गोवंशाची अवैध वाहतूक करणारी वाहने तात्काळ जप्त करून, संबंधित तस्करांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.आदी मागण्या केल्या आहेत.बकरी ईदच्या काळात परिसरातील शांतता, सुव्यवस्था आणि पारंपरिक धार्मिक सलोखा टिकून राहण्यासाठी पोलीस प्रशासनाने वेळेत आणि तात्काळ पावले उचलावीत, अशी विनंतीही या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी युवा हिंदू प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## ५६ वेळा रक्तदान करून वाचवले अनेकांचे प्राण

### सुरज यादव यांचा डीवायएसपी प्रदीप पाटील यांच्या हस्ते सन्मान



**खामगांव, २३ मे (गुड इव्हिनिंग सिटी)** : येथील रक्तदाते सुरज यादव यांनी १८ वर्षांच्या प्रवासात आज ५६ व्यांदा रक्तदान केले. आतापर्यंत त्यांच्या रक्तामुळे १६८ रुग्णांना जीवदान मिळाले आहे.स्थानिक सामान्य रुग्यालयात एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशन आणि अदाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय रक्तपेढीत नुकतेच रक्तदान शिबिर संपन्न झाले. या शिबिरास्थळी आलेल्या डीवायएसपी प्रदीप पाटील यांनी सुरज यादव यांचा सन्मान केला.नियमित रक्तदान करणारे डीवायएसपी प्रदीप पाटील यांनी रक्तदान करत वर्दीचा उद्देश फक्त पकडणे नसून जीव वाचवणे सुद्धा आहे असा प्रेरणादायी संदेश दिला. यावेळी ५० रक्तदात्यांनी या शिबिरात सहभाग नोंदवत रक्तदान केले, ज्यामुळे आगामी काळात १५० रुग्णांना रक्ताचा पुरवठा होऊ शकणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश पारीक यांनी केले. या प्रसंगी अजय कडुकार, राजू घाटे, प्रदीप शमी, ईशाक मोहम्मद, नारायण सैरीसे यांच्यासह अदाणी फाउंडेशन व शासकीय रुग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. समाजातील या महान कार्याचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.